# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 2961 दिनांक : ०१.११.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४२६२ दि. ०१.११.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून पासून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वारंवार परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

**तरी संदर्भिय पत्रानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १५.११.२०१९ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात येत आहे. त्या बाबतीत महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना योग्य ती सूचना देण्यात यावी.**

**त्याच बरोबर या कार्यालयाचे सुधारित फी परिपत्रक दि. ६.१०.२०१९ नुसार तसेच महाविद्यालयांना / संस्थांना / विद्यापीठांना वारंवार परिपत्रकाद्वारे कळवूनही अद्यापही अनेक महाविद्यालयांनी फी दुरुस्ती केली नाही असे निदर्शनास आले आहे. तरी ज्या महाविद्यालयांनी सदर परिपत्रकानुसार फी दुरुस्ती केली नाही. त्या सर्व महाविद्यालयांनी /संस्थांनी / विद्यापीठांनी दि. ५.११.२०१९ रोजी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयात उपस्थित राहून सदर फी दुरुस्ती करुन घ्यावी. कोणत्याही महाविद्यालयाची / संस्थेची / विद्यापीठाची दुरुस्ती अभावी अथवा मंजूरी अभावी फी च्या रक्कमेत तफावत राहिल्यास त्याकरिता संबंधित महाविद्यालय/ संस्था / विद्यापीठ पूर्णपणे जबाबदार राहील.**

**तसेच विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर पाठविलेल्या ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्यांच्या लॉगीनवरुन अचूक पडताळणी करुन तातडीने पुढे पाठविण्यात यावेत. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.**

**(डॉ. विजय नारखेडे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.